**जयपूरमधील थप्पडनाट्य आणि आंदोलकांचे 'पब्लिसिटी' राजकारण :की प्रसिद्धीचा बुरखा?**

नीट पेपरफुटी, शिक्षण व्यवस्था आणि बेरोजगारीच्या नावाखाली जयपूरच्या शहीद स्मारकावर सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान 'कॉकरोच जनता पार्टी'चे संस्थापक अभिजीत दीपके यांना भरचौकात लागलेली कानशिलात सध्या देशभर चर्चेचा विषय ठरली आहे. ...

---> अग्रलेख - पान 2 वर


दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

**तरुणीला धरणाच्या कालव्यात ढकललं पोलिसांनी आरोपीला पकडले**

**पुणे :** जिल्ह्यात गेल्या काही महिन्यांपासून गुन्हेगारीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली असून महिलांवरील अत्याचारांच्या घटनाही सातत्याने समोर आल्या आहेत. त्यातच, आता मंचरजवळील निघोटवाडी फाटा येथे एका तरुणीला डिंभे धरणाच्या उजव्या कालव्यात फेकून दिल्याची व त्यानंतर आरोपी तरुणाने स्वतः पाण्यात उडी मारल्याची धक्कादायक घटना घडली आहे. पाण्यात उडी मारल्यानंतर आरोपी तरुणाला स्थानिकांनी वाचविले असले तरी तरुणी मात्र पाण्यात वाहून गेली होती. सुमारे 18 तासांच्या शोध मोहिमेनंतर या तरुणीचा मृतदेह सापडला आहे. याप्रकरणी आरोपीला मंचर पोलिसांनी अटक केली आहे.

छत्रपती संभाजीनगर ❀ मंगळवार, दि. १६ जून २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ५७ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com

## "ही काय भारत-पाकिस्तानची बॉर्डर नाही!" RTO अधिकाऱ्यांमध्ये फोनवर खडाजंगी; व्हायरल झालेल्या ऑडिओ क्लिपने खळबळ



**छत्रपती संभाजीनगर :** वैजापूरच्या हद्दीत वाहनांवर करण्यात आलेल्या दंडात्मक कारवाईवरून आरटीओ विभागातील दोन अधिकाऱ्यांमध्ये फोनवर झालेली तीव्र शाब्दिक चकमक आता चर्चेचा विषय ठरली आहे. "ही काय भारत-पाकिस्तानची बॉर्डर नाही" या वाक्यामुळे गाजत असलेल्या ऑडिओ क्लिपमुळे आरटीओ विभागातील अंतर्गत संघर्ष, अधिकार क्षेत्राचा वाद आणि कथित वसुलीच्या आरोपांवर नव्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या या ऑडिओ क्लिपमध्ये वैजापूर हद्दीतील वाहनांवर बाहेरून आलेल्या भरारी पथकाकडून कारवाई करण्यात आल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. स्थानिक अधिकाऱ्याने संबंधित पथकाला वैजापूरच्या हद्दीत कारवाई करण्याचा अधिकार नसल्याचा दावा करत तीव्र आक्षेप नोंदवला आहे.

ऑडिओमधील संभाषणानुसार, भरारी पथकातील अधिकारी योगेश मोरे यांच्याशी एका स्थानिक अधिकाऱ्याची फोनवर चर्चा झाली. यावेळी वैजापूरच्या हद्दीतील वाहनांना दंड का आकारला जात आहे, असा सवाल उपस्थित करण्यात आला. त्यावर "हद्द कुठून सुरू होते आणि कुठे संपते, हे स्पष्ट नाही" अशी भूमिका मोरे यांनी घेतल्याचे संभाषणात ऐकायला मिळते.

दरम्यान, स्थानिक अधिकाऱ्याने या प्रकरणात अधिक गंभीर आरोप करत एका निलंबित मोटार वाहन निरीक्षकाच्या सांगण्यावरून काही वाहनांना लक्ष्य करून कारवाई केली जात असल्याचा दावा केला. वैजापूर परिसरात कथित वसुलीचे रॅकेट सुरू असल्याचा आरोपही त्यांनी संभाषणादरम्यान केला आहे.

विशेष म्हणजे, "तुम्ही कायद्यानुसार काम करत असाल तर आम्हालाही काही आक्षेप नाही. मात्र, विशिष्ट वाहनांनाच वारंवार लक्ष्य केले जात असेल तर त्यामागील कारणांची चौकशी झाली पाहिजे," अशी भूमिका स्थानिक अधिकाऱ्याने मांडल्याचे या क्लिपमध्ये दिसून येते.

दुसरीकडे, योगेश मोरे यांनी सर्व कारवाया नियमानुसारच करण्यात आल्याचा दावा केला आहे. संबंधित वाहनाचा टॅक्स थकीत होता, फिटनेस प्रमाणपत्र कालबाह्य झाले होते आणि वाहन ओव्हरलोड असल्याने दंडात्मक कारवाई करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कोणाच्याही सांगण्यावरून किंवा दबावाखाली कारवाई करण्यात आलेली नसल्याचेही त्यांनी संभाषणात म्हटले आहे.

या संपूर्ण प्रकरणामुळे आरटीओ विभागातील समन्वयाचा अभाव, अधिकार क्षेत्रावरील संभ्रम आणि कथित वसुलीच्या आरोपांची चर्चा पुन्हा एकदा ऐरणीवर आली आहे. मोरे यांनी या प्रकरणाची तक्रार छत्रपती संभाजीनगर येथील वरिष्ठ आरटीओ अधिकाऱ्यांकडे केल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, व्हायरल झालेल्या ऑडिओ क्लिपमधील संभाषणाची स्वतंत्ररित्या पुष्टी झालेली नसली तरी या प्रकरणामुळे आरटीओ विभागात मोठी खळबळ उडाली असून संबंधित आरोपांची चौकशी होण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

## "साहेब येणार आहेत...!" तुकाराम मुंढेंच्या नुसत्या नावानेच बाजारपेठा गपकन बंद

### भेसळयुक्त व्यावसायिक, टपरी चालकांचे धाबे दणाणले!

**किराणा दुकानदार, मिठाईवाले पळाले**

**अनेक छोटे मोठे व्यावसायिक हॉटेल्स, पान टपरी, गुटखा व पान मसाल्याची दुकाने, एवढेच नाही तर अनेकांनी किराणा दुकाने, मिठाईची दुकाने बंद करून पोबारा करण्यातच धन्यता समजली. आता तुकाराम मुंढेंच्या आदेशाने अन्न आणि औषध प्रशासनाचा बडगा ग्रामीण भागातही उभारल्या जाऊ लागल्याने अनेक भागात भेसळ करणारे छोटे मोठे व्यावसायिक धास्तावले आहेत.**

**बुलढाणा :** राज्यातील धडाडीचे आणि कडक शिस्तीचे सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांनी अन्न आणि औषध प्रशासन विभागाच्या आयुक्तपदाची धुरा सांभाळताच राज्यात कारवाईचा प्रचंड धडाका सुरू केला आहे. त्यांच्या या धडक कारवाईचा धास्ती एवढी आहे की, साहेब तपासणीसाठी येणार असल्याच्या केवळ एका अफवेने राज्यातील मोठ्या बाजारपेठा काही मिनिटांत कुलूपबंद होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर तालुक्यातील सर्वात मोठी बाजारपेठ असलेल्या डोणगाव येथे सोशल मीडियावर 'एफडीएचे साहेब येणार' असा मेसेज फिरताच संपूर्ण बाजारपेठ काही मिनिटांत बंद झाली. किराणा, मिठाई दुकानांसह पानटपऱ्या आणि हॉटेल्स चालकांनी दुकाने बंद करून पळ काढला.

अवैध गुटखा, पानमसाला आणि तंबाखूजन्य पदार्थांची सर्रास विक्री करणाऱ्या टपरी चालकांमध्ये आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या पथकाची मोठी दहशत निर्माण झाली आहे. रविवारी परळीमध्ये एफडीएचं पथक कारवाई करणार असल्याची बातमी वाऱ्यासारखी बीडमध्ये पसरली. त्यानंतर बीडमधील बहुतांश पानटपऱ्या चालकांनी कारवाई होण्यापूर्वीच आपल्या टपऱ्यांना कुलूप ठोकले.

**'मकोका'च्या इशाऱ्याची धास्ती :** राज्यात अवैध गुटखा आणि पानमसाल्याची विक्री रोखण्यासाठी आयुक्त मुंढे यांनी ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. आता गुटख्याचे उत्पादन करणाऱ्यांपासून ते अगदी किरकोळ विक्री करणाऱ्या टपरी चालकांपर्यंत सर्वांवर थेट महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (MCOCA) अंतर्गत कडक कारवाई करण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत. या कठोर निर्णयामुळे माफियांचे धाबे दणाणले आहेत.

**औषधांसाठी बळजबरी केल्यास कारवाई! :** औषध विक्रीच्या नावाखाली रुग्णांची होणारी आर्थिक लूट थांबवण्यासाठी एफडीए आयुक्तांनी मोठा दिलासादायक निर्णय घेतला आहे. आता कोणतीही हॉस्पिटल्स रुग्णांना किंवा त्यांच्या नातेवाईकांना त्यांच्याच अंतर्गत असलेल्या फार्मसीमधून औषध खरेदी करण्यासाठी सक्ती करू शकत नाहीत. या संदर्भातील अधिकृत आदेश त्यांनी जारी केले असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रुग्णालयांवर थेट परवाना रद्द करण्याची कडक कारवाई केली जाणार आहे.

**नांदेडमध्ये रुग्णाला दिल्या मुदत संपलेल्या गोळ्या :** नांदेड शहरातून एक अत्यंत गंभीर आणि संतापजनक प्रकार समोर आला आहे. येथील डॉक्टर लेन भागातील एका नामांकित मेडिकल स्टोअरमधून रुग्णाला थेट मुदत संपलेल्या (Expired) गोळ्या विकल्या गेल्या. परडवाडी येथील रहिवासी हनुमंतराव मारोतराव वनाळेकर यांनी हा प्रकार उघडकीस आणला. त्यांनी कोणत्याही स्थानिक दबावाला बळी न पडता थेट एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांना ईमेलद्वारे पुराव्यांसह लेखी तक्रार पाठवली. या गंभीर तक्रारीची दखल घेत अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने नांदेडमधील संबंधित मेडिकल स्टोअरवर धाड टाकून औषधसाठ्याची तपासणी सुरू केली असून, सदर मेडिकलवर कठोर कारवाईची प्रक्रिया सुरू आहे.

## भारत-श्रीलंका सामन्यात तिलक वर्मा अंपायरशी भिडला, नंतर वैभव सूर्यवंशी श्रीलंकन खेळाडूंना मारायला पळाला

**डम्बुला :** श्रीलंकेत सुरू असलेल्या तिरंगा मालिकेत सोमवारी रोमांचक सामना रंगला. यजमान श्रीलंका अ संघाविरुद्धच्या या सामन्यात इंडिया अ संघाला सुपर ओव्हरमध्ये पराभव स्वीकारावा लागला. प्रथम फलंदाजी करताना सूर्यांश शेडगे आणि विप्राज निगमच्या अर्धशतकांच्या जोरावर भारताने 265 धावा केल्या. प्रत्युत्तरात श्रीलंका अ संघानेही तितक्याच 265 धावा करत सामना बरोबरीत आणला आणि निकालासाठी सुपर ओव्हरचा आधार घ्यावा लागला. मात्र, सामन्याच्या शेवटच्या क्षणी मैदानावर दोन्ही संघांच्या खेळाडूंमध्ये झालेली शाब्दिक चकमक सध्या चर्चेचा विषय ठरली आहे.

**सामना टाय की सुपर ओव्हर? मैदानावरच जबरदस्त ड्रामा :** सामन्याच्या शेवटच्या चेंडूवर श्रीलंका अ संघाला विजयासाठी 2 धावांची गरज होती. मात्र सी. गुणसेकराने एक धाव घेतली आणि दुसऱ्या धावेसाठी धावताना तो धावबाद झाला. त्यानंतर सामना टाय झाल्याचे स्पष्ट झाले. पण गुणसेकरा धावबाद होताच पंच आणि भारतीय कर्णधार तिलक वर्मा यांच्यात जोरदार चर्चा सुरू झाली. प्रसारणकर्त्यांनी सुरुवातीला सामना टाय झाल्याचे दाखवले, तर स्क्रीनवर तिलक आणि पंचांमधील वादही दिसत होता. तिलक वर्मा सुपर ओव्हर खेळवण्याच्या बाजूने असल्याचे चित्र होते. बराच वेळ चर्चा आणि वादविवाद झाल्यानंतर तिसऱ्या पंचांनी अखेर सामना सुपर ओव्हरद्वारे निकालात लावण्याचा निर्णय दिला. श्रीलंकाला प्रथम फलंदाजी करायची होती. भारतीय खेळाडू मैदानाबाहेर गेले होते, त्यामुळे त्यांना घाईघाईने पुन्हा क्षेत्ररक्षणासाठी यावे लागले. दुसरीकडे श्रीलंकेचे फलंदाज मैदानात येण्यासाठी थोडा वेळ घेत असल्याने आणखी गोंधळ निर्माण झाला.

**श्रीलंकेच्या सुपर ओव्हरनंतर पुन्हा रंगला नवा वाद :** सुपर ओव्हरमध्ये श्रीलंकेची फलंदाजी सुरू असतानाही नाट्यमय घडामोडी थांबल्या नाहीत. शेवटच्या वैध चेंडूपूर्वी सहावा चेंडू नो-बॉल आहे की नाही, यावरून मोठा संभ्रम निर्माण झाला. तिसऱ्या पंचांनी व्हिडीओ पाहून तो चेंडू नो-बॉल असल्याचा निर्णय दिला. या निर्णयादरम्यानही तिलक वर्मा काही मुद्द्यांवरून पंचांशी चर्चा करताना दिसले.

श्रीलंकेने आपली फलंदाजी पूर्ण केल्यानंतर भारताला विजयासाठी 17 धावांचे लक्ष्य मिळाले. त्यावेळी तिलक वर्मा याने मैदानावरील प्रकाशाबाबतही पंचांकडे तक्रार केल्याचे दिसले. पंचांनी लाइट मीटरच्या मदतीने प्रकाशाची तपासणी केली आणि त्यानंतर भारतीय फलंदाजांना फलंदाजीसाठी मैदानात पाठवण्यात आले.

## थोडक्यात वार्ता

### तृणमूलचे बंडखोर 'नॅशनलिस्ट सिटिझन्स पार्टी'त विलीन

**नवी दिल्ली :** पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेस पक्षाला राष्ट्रीय पातळीवर मोठा धक्का बसला आहे. तृणमूलमधून बाहेर पडलेल्या २० बंडखोर खासदारांच्या गटाने रविवारी 'नॅशनलिस्ट सिटिझन्स पार्टी ऑफ इंडिया' या पक्षात विलीन होण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. या विलीनीकरणानंतर बंडखोर गटाने केंद्र सरकारमधील भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीला अधिकृत पाठिंबा जाहीर केला आहे. बंडखोर खासदारांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन एनसीपी पक्षात विलीन झाल्याचे आणि एनडीएला पाठिंबा देत असल्याचे अधिकृत पत्र सुपूर्द केले.

### विद्यार्थ्यांच्या आरोग्य, सुरक्षितता आणि सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध!

शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांचे प्रतिपादन

**नंदुरबार :** "शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांच्या आरोग्य, सुरक्षितता आणि सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध आहे. प्रत्येक विद्यार्थी सक्षम, सुसंस्कृत आणि राष्ट्रभक्त नागरिक घडला पाहिजे. शिक्षण हाच दऱ्याखोऱ्यांतील आदिवासी बांधवांच्या प्रगतीचा सर्वात प्रभावी मार्ग आहे," असे प्रतिपादन राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी केले. शैक्षणिक वर्ष 2026-27 च्या शुभारंभानिमित्त आणि प्रवेशोत्सव-आनंदोत्सव कार्यक्रमानिमित्त नंदुरबार जिल्ह्यातील धडगाव तालुक्यातील दुर्गम तोरणमाळ येथील नेताजी सुभाषचंद्र बोस आवासीय विद्यालयात विद्यार्थ्यांचे स्वागत करताना ते बोलत होते. शाळेच्या पहिल्या दिवशी राज्यभरात प्रवेशोत्सव आणि आनंदोत्सवाच्या माध्यमातून नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात येत असल्याचे सांगत मंत्री श्री. भुसे यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा दिल्या.


### आता फक्त हवेत 16 खासदार! भाजप राज्यसभेत दोन तृतियांश बहुमतापासून अवघ्या 16 जागा दूर

**मुंबई :** तृणमूल कांग्रेस (TMC) मधील ताज्या राजकीय फुटीचा थेट परिणाम संसदेत होणार आहे. या बंडखोरीमुळे संसदेच्या दोन्ही सभागृहात सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीला (NDA) मोठा फायदा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राज्यसभा निवडणुकीचे गणित आणि टीएमसीच्या बंडखोर खासदारांची भूमिका यामुळे भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए राज्यसभेत दोन तृतियांश बहुमताच्या अत्यंत जवळ पोहोचू शकते. सध्याच्या आकडेवारीनुसार, एनडीए राज्यसभेत दोन तृतियांश बहुमतापासून अवघ्या 16 जागा दूर आहे. मात्र, लोकसभेत बंडखोर खासदारांचे समर्थन मिळूनही एनडीए या जादूई आकड्यापासून अजूनही बरीच मागे आहे.

### युद्धखोर इस्रायलचा अमेरिका-इराण शांतता करार स्वीकारण्यास नकार

**नवी दिल्ली :** इस्रायलने अमेरिका आणि इराण यांच्यातील शांतता करार स्वीकारण्यास नकार दिला आहे. संरक्षण मंत्री इस्रायल काट्झ यांनी असेही म्हटले आहे की, त्यांचे सैन्य दक्षिण लेबनॉनमधून माघार घेणार नाही. लेबनॉन, सीरिया आणि गाझामध्ये स्थापित सुरक्षा क्षेत्रांमध्ये इस्रायली सैन्य अनिश्चित काळासाठी तैनात राहील. दरम्यान, इस्रायलचे राष्ट्रीय सुरक्षा मंत्री इतामार बेन ग्विर यांनी शांतता करारावर नाराजी व्यक्त केली आणि म्हटले, "आम्ही अमेरिकेचे गुलाम नाही. इस्रायल एक स्वतंत्र देश आहे आणि राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा हा करार इस्रायलला लागू होत नाही." दरम्यान, पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी घोषणा केली की अमेरिका आणि इराण 19 जून रोजी स्वित्झर्लंडमधील जिनिव्हा येथे शांतता करारावर स्वाक्षरी करतील. असे झाल्यास, 47 वर्षांनंतर तेहरान आणि वॉशिंग्टन यांच्यातील ही पहिली उच्चस्तरीय बैठक असेल.

### "खरं की काय"




## सिग्मा हॉस्पिटलजवळ भरदिवसा थरार; हॉटेल व्यावसायिकाला मारहाण

**छत्रपती संभाजीनगर :** दर्गा परिसरातील सिग्मा हॉस्पिटलजवळ भरदिवसा घडलेल्या एका धक्कादायक घटनेने शहरात खळबळ उडाली आहे. सुतगिरणी चौकातील माऊली हॉटेलचे मालक अमोल तुकाराम घोडके (वय 36) यांना हॉटेल बंद करण्याची धमकी देत पाच जणांनी दगड, लाकडी दांडे आणि चाकूने बेदम मारहाण केली. या हल्ल्यात घोडके गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर घाटी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या प्रकरणी जवाहरनगर पोलिस ठाण्यात सचिन बडवे, अजय दाभाडे, मनोज शिंदे, अजय शिंदे आणि अक्षय डोसावाला यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जखमी अमोल घोडके यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी कारवाई सुरू केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, 9 जून रोजी दुपारी सुमारे दीड वाजण्याच्या सुमारास अमोल घोडके हे सुतगिरणी चौकातील त्यांचे माऊली हॉटेल बंद करून दुकानासाठी लागणारे साहित्य खरेदी करण्यासाठी स्कुटीवरून निघाले होते. सिग्मा हॉस्पिटलकडे जाणाऱ्या रस्त्यावर, नाल्याजवळील परिसरात पोहोचताच पाच जणांनी अचानक त्यांची वाट अडवली.

-> पान 2 वर

## प्रवेशोत्सव : रथातून विद्यार्थ्यांचे आगमन

### मंत्री अतुल सावे यांची 50 लाखांच्या निधीची घोषणा; गणवेश, पुस्तके व शैक्षणिक साहित्याचे वितरण



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, नारेगाव (मराठी व उर्दू) येथे सन २०२६-२७ शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभानिमित्त शहरस्तरीय शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांचे सजविलेल्या रथातून शाळेत आगमन करून स्वागत करण्यात आल्याने प्रवेशोत्सवाला विशेष आकर्षण प्राप्त झाले. कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, महापौर समीर राजूरकर, नगरसेवक मतीन पटेल, गोकुळ मलके, काकासाहेब काकडे, सिद्धार्थ साळवे, मनपा आयुक्त अमोल येडगे, उपायुक्त अंकुश पांढरे, पंचायत समिती सभापती कल्याण गायकवाड, कार्यक्रम अधिकारी ज्ञानदेव सांगळे, शिक्षणाधिकारी भारत तीनगोटे यांच्यासह विविध पदाधिकारी, शिक्षक, पालक व

-> पान 2 वर



# संपादकीय

## जयपूरमधील थप्पडनाट्य आणि आंदोलकांचे 'पब्लिसिटी' राजकारण :की प्रसिद्धीचा बुरखा?

नीट पेपरफुटी, शिक्षण व्यवस्था आणि बेरोजगारीच्या नावाखाली जयपूरच्या शहीद स्मारकावर सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान 'कॉकरोच जनता पार्टी'चे संस्थापक अभिजीत दीपके यांना भरचौकात लागलेली कानशिलात सध्या देशभर चर्चेचा विषय ठरली आहे. इतकी प्रचंड पोलीस यंत्रणा आणि शेकडो समर्थकांचा गोतावळा तैनात असतानाही एका आंदोलक नेत्याला अशी जाहीर मारहाण होतेच कशी, हा मोठा संशयास्पद प्रश्न आहे. सुरक्षा व्यवस्थेला गुंगारा देऊन घडलेले हे थप्पडनाट्य खरोखरच वैचारिक मतभेदातून झाले की केवळ राष्ट्रीय स्तरावर प्रसिद्धी मिळवून 'हेडलाईन'मध्ये चमकण्यासाठी रचलेला एखादा पूर्वनियोजित पब्लिसिटी स्टंट, अशी शंका घेण्यास आता नक्कीच वाव निर्माण झाला आहे. आजकालच्या आंदोलनांमधील गांभीर्य संपत चालले असून, स्वतःचे राजकीय अस्तित्व टिकवण्यासाठी असे प्रसंग जाणीवपूर्वक घडवून आणले जात आहेत की काय, असा संशय निर्माण होत आहे. या मारहाणीच्या प्रकरणाचा गैरफायदा घेत आता नेहमीप्रमाणे पत्रकार परिषदांचा धडाका लावून आणि गांधीवादी विचारांचा सोयीस्कर बुरखा पांघरून स्वतःची पब्लिसिटी करण्याचा केविलवाणा प्रयत्न सुरू झाला आहे. अण्णा हजारे यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्यांच्या ऐतिहासिक आंदोलनांची नक्कल करत, केवळ प्रसिद्धीच्या हव्यासापोटी अशा आंदोलकांनी आता 'स्टंटबाजी'चा नवा फंडा शोधून काढला आहे. ज्या तरुणाने कानशिलात लगावली, त्याने या आंदोलकांना 'देशाची दिशाभूल करणारे' म्हणून संबोधले आहे. पेपरफुटीसारख्या गंभीर आणि संवेदनशील विषयाचे केवळ निमित्त करून, देशातील तरुणांच्या भावनांशी खेळत स्वतःला मोठे नेते म्हणून प्रोजेक्ट करण्याची ही धडपड आता सामान्य जनतेच्याही चांगलीच लक्षात येऊ लागली आहे. विशेष म्हणजे, या संपूर्ण गोंधळात आंदोलनस्थळी आलेल्या अनेक सामान्य नागरिकांचे मोबाईल फोन आणि इतर सामान चोरीला गेले. जनतेचे प्रश्न सोडवण्याचा आव आणणाऱ्या या कथित नेत्यांच्या आंदोलनात स्वतःच्या समर्थकांच्या सामानाची सुरक्षा राखता येत नाही, तिथे हे लोक देशातील तरुणांचे प्रश्न काय सोडवणार, हा मोठा विनोदच म्हणावा लागेल. मारहाण झाली की लगेच व्यासपीठावरून हिंदू-मुस्लिम आणि जाती-धर्माचे राजकारण सुरू करायचे, भावनावश घोषणा द्यायच्या आणि लगेच 'दिल्ली चलो'चा नारा देऊन २० जून रोजी पुन्हा नवीन मोर्चाची घोषणा करायची, ही अगदी ठरवून केलेली स्क्रिप्ट वाटते. केवळ प्रसिद्धीच्या झोतात राहण्यासाठी आणि राजकीय पुनर्वसनासाठी कायदा यंत्रणेला वेठीस धरणाऱ्या अशा ढोंगी आंदोलकांना आता चोख उत्तर देण्याची वेळ आली आहे. कुठलाही ठोस अभ्यास नसताना, केवळ केंद्रीय मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करत गोंधळ घालायचा आणि प्रसिद्धी मिळवायची, हा धंदा थांबला पाहिजे. प्रशासनाने आणि पोलिसांनी अशा फुटकळ स्टंटबाजांच्या नाटकबाजीला अजिबात भीक न घालता, आंदोलन आणि प्रसिद्धीच्या नावाखाली शांतता भंग करणाऱ्यांची चांगलीच जिरवली पाहिजे. कॅमेऱ्याच्या फ्लॅशलाईटसमोर रडगाणे गाणाऱ्या अशा प्रसिद्धीलोलुप नेत्यांना त्यांची खरी जागा दाखवून दिल्याशिवाय देशातील खऱ्या आणि प्रामाणिक आंदोलनांची पत राखली जाणार नाही.

# आता तरी मुख्यमंत्री व राज्यातील खासदारांनी स्मार्ट मिटर बाबत व्यक्त व्हावे -राजेंद्र दाते पाटील

मुंबई (प्रतिनिधी) खुप पूर्वीच टी ओ डी तथा स्मार्ट मीटर राज्य भरात रद्द करून न्याय द्यावा अशी जोरदार जनहिताची मागणी जन आंदोलन विकास कृती समिती महाराष्ट्राचे अध्यक्ष आणि पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी मुख्यमंत्र्या कडे केली असता या मागणीची गांभीर्याने दखल घेत हा प्रस्ताव उर्जा विभागाच्या प्रधान सचिव आभा शुक्ला यांचे कडे पुढील कारवाई साठी पाठवला होता,आता तरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्यातील सर्वच खासदारांनी स्मार्ट मिटर बाबत व्यक्त व्हावे अशीही मागणी त्यांनी केली आहे.

त्या वेळी मुख्यमंत्र्यांनी दखल घेऊन स्मार्ट मीटर कुठेही बसवणार नाही हा मुख्यमंत्र्यांचा निर्वाळा असतांना आणि ही बाब भर सभागृहात स्पष्ट झालेली आहे परंतु वरिष्ठ अधिकारी सर्व सामान्य ग्राहकांची दिशाभुल करत आहेत ! असे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी म्हंटले आहे.

आपल्या सविस्तर निवेदनात त्यांनी नमुद केले होते की, टी.ओ.डी तथा स्मार्ट मीटर राज्यभरात रद्द करून न्याय द्यावा अशी मागणी मुख्यमंत्र्या कडे केली असता या मागणीची गांभीर्याने दखल घेत हा प्रस्ताव उर्जा विभागाच्या प्रधान सचिव आभा शुक्ला यांचे कडे पुढील कारवाई साठी पाठवला होता.

**मुख्यमंत्र्यांनी घेतली दखल !**

स्मार्ट मीटर कुठेही बसवणार नसल्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा निर्वाळा असुन तशी कबुलीच एका सादरी करणात स्पष्ट होत असताना ही काही अधिकारी अधिकची दिशाभुल करण्याचे काम करीत असुन नव्याने ही बाब मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कडे मांडावी लागेल असेही जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील म्हणाले.

**सध्या जनहीत याचीका मधुन हे प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे**

न्यायालयामधील या जनहित याचिकेत केंद्र शासनाच्या स्मार्ट ग्रिट मिशन मार्गदर्शक तत्वे १८ जानेवारी २०२५, तसेच सी इ ए म्हणजेच मीटरची स्थापना आणि संचलन सुधारणा नियम २०१९,व एमईआरसी पुरवठा नियम २०२१ या विषयावर चर्चा करण्या साठी सन्माननीय उच्च न्यायालय उत्तर अपेक्षित करीत आहेत.

**मुख्यमंत्री यांचे कडे महत्वपूर्ण मागणी**

याच प्रमाणे त्यांनी महत्त्वपूर्ण मागणी मुख्यमंत्री यांचे कडे केली होती त्यात सुध्दा त्यांनी नमुद केले होते की,५०० युनिट पर्यंत वीजबील माफ करावे आणि याची योग्य ती दखल घेऊन हा प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माफी साठी प्रस्ताव उर्जा विभागाकडे पाठवला होता.

**जनहितार्थ अत्यंत अभ्यासु निवेदन**

खास बाब म्हणजे आपल्या अत्यंत अभ्यासु निवेदनात शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी नमुद केलेले आहे की, अगदी सुरुवाती पासुनच स्मार्ट मीटर, टीओडी मीटर बसवण्या च्या प्रक्रियासाठी देश भरासह संपुर्ण महाराष्ट्र विरोध करीत असुन कमी वीज वापर णाऱ्या घरगुती ग्राहकांना पहिल्या वर्षी १० टक्के सवलत, स्मार्ट मीटर वापरणाऱ्यांना दिवसा वीज वापरावर अतिरिक्त १० टक्के टीओडी लावण्याचे धोरण नागरिकांना वेठीस धरणारे ठरणारअसल्याचे त्यांनी नमुद करून हा प्रश्न उपस्थित केला की, जर का हरित ऊर्जा खरेदी तून आगामी ५ वर्षांत वीज खरेदीचे ६६ हजार कोटी रुपये वाचणार असतील तर वीजदरात ५०० युनिट पर्यंत सामाईक असा (युनिफॉर्म) उपाययोजना का केल्या जात नाही ? असा परखड सवाल उपस्थित करून १०० पासुन ३०० युनिट पर्यंत फक्त सहा पैशांची सवलत? याला कशाचे द्योतक म्हणावे ?असा जळ जळीत सवाल देखील जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी उपस्थित केला होता.

राज्यात पहिल्यांदाच घरगुती, औद्योगिक,व्यावसायिक वीजदर पहिल्या वर्षी १० टक्के आणि पाच वर्षांत २६ टक्के कमी होणार आहे. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने (एमईआरसी) महा वितरणच्या याचिकेवर दिलेल्या आदेशा मुळे सध्या असलेले १०१ ते ३०० -१३.२३ रुपये २०२५- २०२६ मध्ये १३.१७ होतील तर सध्याचे ३०१ ते ५०० युनिट १७.७८ एवढी असून ती २०२५-२०२६वर्षात १७.५६ एवढी होणार तर ५०० युनिट च्या पुढील सध्या १९.२३ रुपये तर वर्ष २०२५- २०२६ या वर्षात १९.१५ म्हणजे फक्त आठ पैशांचा फरक असणार आहे आणि हीच बाब शासनाची



काय दृष्टी आहे हे अभिप्रेत करणारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते.

पुढे डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी नमुद केले होते की, राज्यातील महावितरण कंपनीने वीजदर कमी करण्यासाठी याचिका केली असता त्यावर एम.ई. आर.सीने जो आदेश दिला आहे तो मुळात व्यापक हिताचा ठरतच नसुन या आदेशाचा लाभ घरगुती वापर करणाऱ्या १०० युनिटच लक्षात घेत औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहकांना हा लाभ होताना भरीव फायदा थेट दिसतच नाही.

पुढे त्यांनी निवेदनात स्पष्ट केले होते की,तत्कालीन महा वितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेशचंद्र यांनी सांगितल्या प्रमाणे स्मार्ट मीटर असलेल्या घरगुती ग्राहकांना दिवसा वीज वापरासाठी दहा टक्केअतिरिक्त टीओडी सवलत व सौरऊर्जा निर्मिती करणाऱ्या घरगुती ग्राहकांना प्रोत्साहन ही या आदेशाची वैशिष्ट्ये सिद्धच होत नाहीत.आगामी पाच वर्षांत जर का महावितरणचे वीज खरेदी चे ६६ हजार कोटी रुपये वाचणार असतील तर त्याचा फायदा सर्वच ग्राहकांना भरीव स्तरावर का नाही ? हा महत्वाचा सवाल जेष्ठअभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी उपस्थित केला होता व नमुद केले होते की, सन २०३० पर्यंत राज्याची विजेची क्षमता ८१ हजार मेगावॅट होण्यासाठी ४५ हजार मेगा वॅटचे वीज खरेदीचे करार केले. त्यापैकी २ हजार मेगावॅट वीज रिन्युएबल अर्थात नवीकरणीय ऊर्जा स्रोतांमधून मिळणार आहे असे असेल आणि ती अत्यंत किफायतशीर दरात मिळणारअसल्यास पाच वर्षांत ६६ हजार कोटी रुपये वाचण्याच्या दाव्याचा फायदा सर्व सामान्य विद्युत ग्राहकांना का नाही ? असे ही त्यांनी नमुद करून महावितरण मुंबईतील काही भागात तर अदानी व टोरेंटो या खासगी वीज कंपन्यांनी एकमेकांच्या परवाना क्षेत्रात वितरण परवाना मिळविण्या साठी आयोगा पुढे याचिका सादरकेल्या आहेत त्या काही जनहिता साठी अजिबात नाही असे नमुद करून पुढे जेष्ठ अभ्यासक डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी अत्यंत मुद्देसुद निवेदन केले असुन आयोगाने २९ मार्च रोजी एक एप्रिल पासूनचे नवीन वीजदर जाहीर केले होते. महावितरणने ४८ हजार कोटी रुपयांची तूट येणार असल्याने वित्तीय ताळे बंदा तून आयोगापुढे मांडण्यात आले होते व त्यानुसार महसूल वाढ देण्याची मागणी महा वितरणने केली होती हे कशा च्या बळावर मांडले होते ? हा देखील अनुत्तरित सवाल आहे. एकंदरीत या निकालाचा अधिकचा व्यापक विचार करून सामान्य गोरगरीब आणि शेतकरी यांच्या उत्पन्नाचा अधिक बारकाईने विचार करून पुनर्विचार करावा आणि स्मार्ट (टी ओ डी )मीटर लावण्याची प्रकिया रद्द करून ५०० युनिट पर्यंतचे विद्युत बील कायम स्वरुपी माफ करावे अशी जोरदार मागणी जन आंदोलन विकास कृती समिती महाराष्ट्राचे अध्यक्ष व पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी केलेली आहे.

खाजगी कंपन्यांना परवान्या मुळे मनमानी वाढेल म्हणून या कंपन्यांना वीज वितरणाचा परवाना मंजूर झाल्यास शासनाच्या महावितरण कंपनीस दुय्यम स्थान प्राप्त होईल आणि खाजगी कंपन्यांची मनमानी वाढुन कालांतराने प्रचंड वीज बीलवाढ होऊन सर्व सामान्य नागरीकांना आर्थिक भुर्दंड वाढणार आहे ही अत्यंत महत्वाची अभ्यासु बाब त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे लक्षात आणुन देत नमुद केले होते की, विद्युत निर्मिती जरी खाजगी कंपन्यांनी केली तरी वितरण व्यवस्था फक्त आणि फक्त महावितरण कंपनी कडेच असावी त्या स्थितीत कोणाची वीज घ्यायची किंवा कुठल्या कंपनीचे वीज मीटर घ्यायचे ही सक्ती वाढेल म्हणुन जनहितार्थ हा होऊ घातलेला निर्णय शासनाने तत्काळ अमान्य करून रद्द करावा अशीही मागणी राज्याच्या मुख्यमंत्र्यां कडे त्यांनी केली असुन या विषयाचे गांभीर्य त्यांनी लक्षात घेतल्याचे स्पष्ट होत आहे. या बाबत जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांना मुख्यमंत्र्यांचा मेल प्राप्त झाला असल्याची बाब महत्वाची ठरत आहे.

**सध्याची गंभीर माहिती व बाब**

अशी आहे की २३मे २०२२ रोजी केंद्र शासनाने याच अधि सूचनेत सुधारणा केली आणि १७ऑगस्ट २०२१ च्या मूळ अधिसूचनेला मागे घेतले असुन(विथड्रॉन) केल्याचे स्पष्ट होत असुन असुन नव्या २०२२ च्या अधिसूचनेत वेळसीमा समान राहिली,असे स्पष्टीकरण देण्यात आलेले आहे.

जनआंदोलन विकास कृती समिती महाराष्ट्राचे अध्यक्ष आणि शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनीं नमुद केले की, केंद्रीय ऊर्जा मंत्र्यांनी एक स्पष्टीकरण केले होते व त्यात नमुद केले आहे की,ग्राहकां साठी प्रीपेड स्मार्ट मीटर्स अनिवार्य नाहीत असे केंद्रीय ऊर्जा मंत्री मनोहर लाल यांनी स्पष्ट केलेले असुन सर्व ग्राहकांसाठी प्रीपेड इलेक्ट्रिक स्मार्ट मीटर्स अनिवार्य नाहीत. लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासा दरम्यान विचारले ल्या पूरक प्रश्नांना उत्तर देताना सुद्धा ते म्हणाले होते की, जर ग्राहकांनी प्रीपेड स्मार्ट मीटर्सचा पर्याय निवडला,तर त्याचा फायदा केवळ ग्राहकांनाच नाही, तर संबंधित राज्ये आणि वीज वितरण कंपन्यां नाही होईल. त्यांनी सांगितले होते की, अनेक राज्यांमध्ये स्मार्ट प्रीपेड मीटर्स बसवण्यात आले आहेत. मंत्र्यांनी हे देखील स्पष्ट केले की, प्रीपेड इलेक्ट्रिक स्मार्ट मीटर्स कोणत्याही ग्राहकांवर बळजबरीने लादले जात नाहीत, कारण ही एक ऐच्छिक सुविधा आहे पुढे त्यांनी असेही म्हंटले आहे की,ज्या ठिकाणी प्रीपेड प्रणाली लागू करण्यात आली आहे,तिथे कंपन्यांचे नुकसान थांबले असून त्या नफ्यात आल्या आहेत.आता ग्राहकांच्या फायदा व नुकसानी चा विचार अजिबात न करता खाजगी कंपन्या आणि त्यांचे व्यवस्थापन यांच्या आर्थिक फायद्यासाठी स्मार्ट मिटरचा (टी ओ डी) फास सर्वसामान्य नागरिकांच्या आणि ग्राहकांच्या गळ्या भवती आवळल्या जात असुन केंद्रीय मंत्र्यांनी त्या वेळी दिलेल्या माहिती नुसार सध्या वीज वितरण कंपन्यांचे नुकसान जवळपास सात लाख कोटी रुपयां पर्यंत पोहोचले आहे. बिलांची योग्य वसुली सुनिश्चित करण्यासाठी प्रीपेड स्मार्ट मीटर्स आणले जात असल्याचे त्यांनी सांगितले आणि यातच सर्व बाबी स्पष्ट होत असल्याची बाब जन आंदोलन विकास कृती समिती महाराष्ट्राचे अध्यक्ष आणि शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी पुढे आणली आहे.

## गंगापूर येथे रक्तदान शिबिरात 71 जणांचे रक्तदान; ऐन तुटवड्यात घाटीच्या रक्तपेढीला मिळाला दिलासा




छत्रपती संभाजीनगर, दि. 15 (प्रतिनिधी) - सध्या सुट्या आणि उन्हाची तीव्रता यामुळे रक्तदानाचे प्रमाण घटले आहेत. यादरम्यान गंगापूर येथे रक्तदान शिबिरात 71 जणांचे रक्तदान झाले. यामुळे ऐन तुटवड्यात घाटीच्या रक्तपेढीला दिलासा मिळाला. स्व.अनिकेत काळे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ जन्मदिनानिमित्त डॉ.प्रशांत पंडूरे यांच्या श्रीबालाजी हॉस्पिटल येथे शिबीर आयोजित केले होते.

शिबिराचे उदघाटन आशुतोष काळे, उपनगराध्यक्ष अमोल जगताप, नगरसेवक अजित राजपूत, नवनाथ कानडे, आनंद पाटील, डॉ. प्रशांत पोपटराव पंडुरे, गोरख चोरमारे, हनुमान काळे, अशोक तिखे, विजय राजपूत, संदीप माघाडे, सिद्धार्थ खाजेकर, आशिष साबणे, राजु खोसे, असिफ शेख, अभिषेक चव्हाण, लक्ष्मण इंगळे,

ऋतिक कबाडे, प्रसाद सुर्यवंशी, डॉ.विलास गायकवाड, डॉ.अमित गुंजाळ, डॉ.श्रीनिवास तौर आदिसह मित्रपरिवार उपस्थित होते. घाटी रक्तपेढीतर्फे बीटीओ डॉ. ओमकार अंचेवाड, समाजसेवा अधीक्षक अनुसया घोगरे यांनी सहकार्य केले.

## सिग्मा हॉस्पिटलजवळ भरदिवसा थरार; हॉटेल व्यावसायिकाला मारहाण

पान 1 वरून ->

"तू सुतगिरणी चौकात तुझं हॉटेल चालवू नको, हॉटेल बंद कर," अशी धमकी देत आरोपींनी त्यांच्याशी वाद घालण्यास सुरुवात केली. काही क्षणांतच वादाचे रूप हिंसक हल्ल्यात बदलले. सचिन बडवे आणि अजय दाभाडे यांनी हातातील लाकडी दांड्यांनी घोडके यांना मारहाण केली. त्यानंतर मनोज शिंदे याने दगडाने त्यांच्या उजव्या पायावर जोरदार वार केला. या हल्ल्यात घोडके यांचा पाय फ्रॅक्चर झाला आणि ते रस्त्यावर कोसळले.

घोडके खाली पडताच आरोपींनी त्यांच्यावर पुन्हा हल्ला चढवला. सचिन बडवे याने डोक्यावर दगड मारण्याचा प्रयत्न केला. मात्र, घोडके यांनी प्रसंगावधान राखत बाजूला सरकल्याने दगड त्यांच्या डाव्या पायाला लागला. दरम्यान, अजय शिंदे याने चाकूने उजव्या कानाजवळ वार करून त्यांना जखमी केले. अक्षय डोसावाला यानेही शिवीगाळ करत मारहाणीत सहभाग घेतल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. हल्ल्यादरम्यान घोडके यांच्या खिशातील मोबाईल फोन आणि सुमारे 15 हजार रुपये खाली पडले. गंभीर जखमी अवस्थेत त्यांनी मदतीसाठी आरडाओरड केली. त्यांच्या आवाजाने परिसरातील रिक्षाचालक आणि सिग्मा हॉस्पिटलसमोरील नागरिक घटनास्थळी धावून आले. नागरिकांना येताना पाहून सर्व आरोपींनी घटनास्थळावरून पळ काढला.

स्थानिकांच्या मदतीने घोडके यांना तातडीने घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान त्यांचा जबाब नोंदविण्यात आला असून त्यानुसार जवाहरनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

भरदिवसा रुग्णालयासारख्या गर्दीच्या परिसरात घडलेल्या या जीवघेण्या हल्ल्यामुळे व्यापारी आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बाळराज सुतार करीत आहेत.

## प्रवेशोत्सव : रथातून विद्यार्थ्यांचे आगमन; मंत्री अतुल सावे यांची 50 लाखांच्या निधीची घोषणा

पान 1 वरून ->

विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते इयत्ता पहिलीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पुष्प व चॉकलेट देऊन स्वागत करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना नवीन गणवेश, पाठ्यपुस्तके व शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले.

यावेळी बोलताना मंत्री अतुल सावे म्हणाले, "पूर्वी विद्यार्थी शाळेत जाताना रडत असत; मात्र आज शाळेत येण्यासाठी त्यांच्यात उत्साह दिसून येतो. पहिल्याच दिवशी गणवेश, पुस्तके आणि विविध सुविधा मिळत असल्याने विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित झाला आहे." त्यांनी शाळेच्या मैदानाच्या विकासासाठी आमदार निधीतून ५० लाख रुपयांची मदत जाहीर केली. तसेच 'अन्नामृत' योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना स्वच्छ, पौष्टिक आणि सात्त्विक भोजन उपलब्ध करून दिले जात असल्याची माहिती दिली.

महापौर समीर राजूरकर यांनी शाळेसाठी शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तातडीने करण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच संरक्षण भिंतीचे काम पुढील दोन महिन्यांत पूर्ण करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. पालकांनी मुलांमध्ये स्वच्छतेच्या सवयी, सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकणे, न थुंकणे आणि चांगला नागरिक बनण्याचे संस्कार रुजवावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

मनपा आयुक्त अमोल येडगे यांनी शिक्षकांच्या कार्याचे कौतुक करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्याचे आवाहन केले. "एकही मूल शिक्षणापासून वंचित राहू नये. पहिलीपासून दहावीपर्यंत प्रत्येक विद्यार्थ्याकडे विशेष लक्ष द्यावे. दहावीचा निकाल शंभर टक्के लागण्यासाठी प्रयत्न करावेत. तसेच दहावीनंतरही विद्यार्थ्यांशी संपर्क ठेवून त्यांना चांगल्या महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी मार्गदर्शन करावे," असे ते म्हणाले.

सुमारे चार हजारांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत असलेल्या या शाळेतील विविध मूलभूत सुविधांबाबतही यावेळी महत्त्वपूर्ण घोषणा करण्यात आल्या.

मनपा केंद्रीय शाळेच्या मुख्याध्यापिका तिलोत्तमा मापारी यांनी प्रास्ताविक केले. उर्दू शाळेचे मुख्याध्यापक जुबेर शेख यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिता पाटील आणि फेरोजखान पठाण यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील सर्व शिक्षक, बालताई, सेवक तसेच पालकांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

## 'स्वयंदीप' : स्वप्रकाशातून समाजप्रकाशाकडे जाणारा काव्यप्रवास

मराठी कवितेच्या विशाल नभांगणात काही काव्यसंग्रह उल्केसारखे क्षणभर चमकून विरून जातात, तर काही ध्रुवताऱ्यासारखे दिशादर्शक ठरतात. कवी निंबाजी बळीराम वाघ यांचा 'स्वयंदीप' हा काव्यसंग्रह दुसऱ्या प्रकारात मोडणारा आहे. या संग्रहात ७९ कविता आहेत. हा संग्रह एका संवेदनशील मनाने जगलेल्या आयुष्याचा, अनुभवल्या वेदनांचा, जपलेल्या मूल्यांचा आणि समाजाशी असलेल्या बांधिलकीचा शब्दरूप दस्तऐवज आहे. 'स्वयंदीप' हे शीर्षकच या काव्यसंग्रहाचा गाभा उलगडून दाखवते. दीप जसा स्वतः जळून परिसर उजळवतो, तसाच कवीचा शब्दही स्वतःच्या अनुभवांच्या तेलावर तेवत राहून समाजाच्या अंधाऱ्या कोपऱ्यांत प्रकाश पेरण्याचा प्रयत्न करतो. या संग्रहातील कविता स्वशोधाचा प्रवास करतात; पण तो स्वकेंद्रित नसून समष्टीकडे जाणारा आहे. म्हणूनच या कवितांमध्ये स्वतःचा शोध घेताना माणसाचा, समाजाचा आणि काळाचा शोधही समांतरपणे सुरू राहतो.

संग्रहातील शीर्षक कविता "स्वयंदीप"" झलक,--

"स्वयंदीप हो तू मानवा
आपला विकास आपल्याच हाती
पैका आला खिशात तेंव्हा
जुळून येती नाती गोती..." ।१।
(पान - १९)


ही कवीच्या जीवनदृष्टीची घोषणा आहे. "ध्येय असूद्या मनी आपुल्या, कष्टाविना काही मिळत नाही" या ओळी केवळ प्रेरणादायी असून त्या जीवनाचा गाभाच उलगडतात. येथे कवीचा शब्द एखाद्या अनुभवी शेतकऱ्यासारखा वाटतो, जो मातीशी संवाद साधत पेरणीचे तत्त्वज्ञान सांगतो. या कवितेतील समाजसेवेचा विचार हा घोषणाबाजी नसून आयुष्यभर सामाजिक कार्यात रमलेल्या व्यक्तीच्या अनुभवातून आलेला आहे. त्यामुळे शब्दांमध्ये कृत्रिमतेचा गंध नसून जगलेल्या जीवनाचा स्पर्श आहे.

पुढे कवीची कविता "बाप" मध्ये कवी म्हणतो,--

"जिवापाड लावला जीव
सुखी केले संसाराला
रात्रंदिन केले कष्ट
सुखी करण्या संसाराला..."।४।( पान - २५ )

निंबाजी वाघ यांची "बाप" ही कविता नात्यांच्या ओलाव्यातही चिंब भिजलेली आहे. "बाप" ही कविता वाचताना वडिलांचे व्यक्तिमत्त्व एखाद्या वटवृक्षासारखे उभे राहते. ज्याच्या सावलीत संसार सुखाने नांदतो, ज्याच्या कष्टांच्या मुळांवर घराचे अस्तित्व उभे राहते आणि ज्याच्या त्यागाच्या फांद्यांवर लेकरांची स्वप्ने बहरतात. "रात्रंदिन केले कष्ट, सुखी करण्या संसाराला" ही ओळ म्हणजे एका पिढीने दुसऱ्या पिढीसाठी वाहिलेल्या आयुष्याचा इतिहासच आहे.

या संग्रहाचे आणखी एक




वैशिष्ट्य म्हणजे ग्रामीण वास्तवाशी असलेली त्याची घट्ट नाळ. "भूक" ही कविता; या कवितेत कवी म्हणतो आहे,----

"अव माय मले लागली व भूक
करकर वाजते व पोट
जीव याकूळल्या गेला
नको सांगू तुझी गोठ" ।१।
( स्वयंदीप पान - १०४)

वाचताना उपासमार ही केवळ एक सामाजिक समस्या राहत नाही; तर ती वाचकाच्या पोटातही कुरतडू लागते. "अव माय मले लागली व भूक" या वऱ्हाडी बोलीतील शब्दांतून व्यक्त झालेली वेदना एखाद्या कोरड्या विहिरीतून उमटणाऱ्या प्रतिध्वनीसारखी मनात घुमत राहते. घुगऱ्यांच्या साध्या ताटातही कवीला जीवनाचा उत्सव दिसतो. ही कविता गरिबीचे चित्रण करून ती जगण्यासाठीच्या संघर्षाचे जीवनतत्त्वज्ञान सांगते.

वाघ यांचे काव्यविश्व एका रंगात रंगलेले दिसत नाही. ते इंद्रधनुष्यासारखे बहुरंगी आहे. एका बाजूला आई-वडिलांच्या नात्यांचा मृदू स्पर्श आहे, तर दुसऱ्या बाजूला सामाजिक विषमता, बेरोजगारी, अंधश्रद्धा आणि अन्यायाविरुद्धचा प्रखर आवाज आहे. त्यांची कविता कधी मायेच्या पाखरासारखी कुशीत घेते, तर कधी वज्रासारखी अन्यायावर कोसळते.

कवीचे सामाजिक भान त्यांच्या जीवनप्रवासातून आलेले आहे. दिव्यांग व्यक्तींसाठी केलेले कार्य, सामाजिक संस्थांमधील सहभाग आणि वंचित घटकांशी असलेला निकटचा संबंध यामुळे त्यांच्या कवितेला वास्तवाचा गहिरा स्पर्श लाभला आहे. म्हणूनच त्यांच्या शब्दांना केवळ कल्पनांचे पंख नाहीत; तर अनुभवांची मुळेही आहेत.

या संग्रहात राष्ट्रप्रेम आहे, मानवी मूल्यांची जपणूक आहे, समतेचा आग्रह आहे आणि विवेकाचा पुरस्कार आहे. त्याचवेळी प्रेमाच्या अबोल भावनांनाही त्यांनी शब्द दिले आहेत. त्यांच्या प्रेमकविता उथळ रोमान्समध्ये रमणाऱ्या नसून त्या चंद्रप्रकाशासारख्या शांत, मंद आणि अंतर्मुख आहेत. त्या भावनांना ओरडून सांगत नाहीत; तर सुगंधासारख्या अलगद पसरतात.



: पुस्तक परीक्षण :
नवनाथ आनंदा रणखांबे

भाषेच्या दृष्टीने पाहिले तर 'स्वयंदीप'ची ताकद त्याच्या साधेपणात आहे. शब्दांचे अवडंबर नाही, अलंकारांचा अतिरेक नाही आणि कृत्रिमतेचा बोजाही नाही. वऱ्हाडी बोलीचे सहज सौंदर्य, ग्रामीण जीवनातील शब्दसंपदा आणि लोकभाषेची नैसर्गिक लय यामुळे कविता अधिक जिवंत बनतात. जशी मातीचा सुगंध कृत्रिम अत्तरापेक्षा अधिक मोहक वाटतो, तशीच या कवितेची भाषा वाचकाला आपलीशी वाटते.

कवी वाघ यांची कविता ही संवादासाठी आहे. ती प्रश्न विचारते, अस्वस्थ करते, विचार करायला भाग पाडते आणि शेवटी आशेचा किरणही दाखवते. म्हणूनच हा संग्रह एका व्यक्तीच्या अनुभवांचा प्रवास न राहता समाजाच्या सामूहिक भावविश्वाचा आरसा बनतो.

एकंदर पाहता 'स्वयंदीप' हा काव्यसंग्रह म्हणजे अनुभवांच्या मातीतून उगवलेले आणि सामाजिक जाणिवांच्या पाण्याने सिंचन झालेले शब्दपीक आहे. यात संघर्ष आहे, करुणा आहे, प्रेम आहे, विद्रोह आहे, विवेक आहे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे माणूसपण आहे. स्वतःच्या प्रकाशाने उजळत इतरांनाही प्रकाश देण्याची क्षमता या संग्रहात आहे.

आजच्या मूल्यसंक्रमणाच्या काळात हा काव्यसंग्रह एखाद्या दीपगृहाप्रमाणे वाटतो. वादळात हरवलेल्या मनांना दिशा देणारा, अंधारातही प्रकाशावर विश्वास ठेवायला शिकवणारा 'स्वयंदीप' हा अनुभवण्याचा काव्यसंग्रह आहे. आपण हा जरूर वाचावा!

पुस्तक परीक्षण : जीवनसंघर्षकार नवनाथजी रणखांबे.

लेखक /कवी / समीक्षक

(अंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय विविध ऐतिहासिक वर्ल्ड बुक ऑफ रिकॉर्ड्स धारक तथा अंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्यस्तरीय विविध पुरस्कारों से सम्मानित)

पुस्तकाचे नाव :- 'स्वयंदीप'
कवी :- निंबाजी बळीराम वाघ
पुस्तक परीक्षण :- जीवनसंघर्षकार नवनाथजी रणखांबे.
लेखक /कवी / समीक्षक
प्रकाशन :- शारदा प्रकाशन ठाणे
एकूण पाने :- १२२
स्वागत मुख्य : १२५/- ₹

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे शाळेचा पहिला दिवस उत्साहात साजरा




हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव,दि.१५ जून :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रामजी नगर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले.शाळा प्रवेश महोत्सवानिमित्त विद्यार्थ्यांचे फुले,टाळ्यांचा गजर आणि आनंददायी उपक्रमांच्या माध्यमातून स्वागत करण्यात आले.नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन त्यांच्या उज्वल भविष्यासाठी प्रेरणादायी मार्गदर्शन करण्यात आले.शाळेच्या मुख्याध्यापकांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून देत विद्यार्थ्यांना नियमित उपस्थिती आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी प्रोत्साहित केले.

यावेळी शिक्षकांनी विविध खेळ,गाणी,गोष्टी आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी आपुलकी निर्माण केली.पालकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून शाळेच्या उपक्रमांचे कौतुक केले.

शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह दिसून आला.नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात सकारात्मक वातावरणात झाल्याने विद्यार्थी,पालक आणि शिक्षकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले.यावेळी नायब तहसीलदार बहुरे साहेब यांनी शाळा भेट दिली या भेटीदरम्यान त्यांनी शाळेत बद्दल अत्यंत समाधानकारक वातावरण आहे असे नमूद केले.याप्रसंगी सोयगाव नगरपंचायतीच्या अध्यक्षा अशाबी तडवी ताई,व्यवस्थापन समिती अध्यक्ष मनोज आगे,उपाध्यक्ष वैशाली पवार, शाळेत समिती सदस्य योगेश बोखारे,माजी विद्यार्थी संघ अध्यक्ष राजू माळी,मनीषा जेठे,शांताराम पाटील शाळेचे मुख्याध्यापक रघुनाथ काटोले,शिक्षक गोपाल चौधरी यांनी मान्यवर यांचे आभार व्यक्त केले.

## कवी शाम बैसाणे यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलन संपन्न



**कल्याण प्रतिनिधी :** कवी कट्टा कल्याण मुंबई आयोजित सामाजिक प्रबोधनाचे कवी संमेलन गुलमोहर कॉलनी, विजयनगर कल्याण पूर्व येथे कवी शाम बैसाणे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. कवी संमेलनास प्रमुख पाहुणे म्हणून कवी अशोक भवार , कवी कट्टा कल्याण मुंबईचे अध्यक्ष नवनाथ रणखांबे आणि सार्थक साहित्य प्रकाशनच्या प्रकाशिका प्रा. आशा रणखांबे या मान्यवरांची उपस्थिती होती. कवी संमेलनात सामाजिक प्रबोधनाच्या दर्जेदार विविध विषयांवर कविता यावेळी सादर करण्यात आल्या.

## शेतीच्या वादातून हत्या चार आरोपी ताब्यात

### छत्रपती संभाजीनगर येथून आरोपी घेतले ताब्यात



हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** शेतीच्या वादातून निर्माण झालेल्या वाद विवादातून भाऊसाहेब जाधव हत्या करण्यात आली याप्रकरणी 14 जून रविवार रोजी रात्री उशिरा सोनपेठ पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला. गोंडगाव ब्रम्हनाथ वाडी शिवारात शेत जमिनीच्या वादातून भाऊसाहेब किसनराव जाधव यांचा खून करण्यात आला आरोपी पसार झाले त्यानंतर आरोपीचा शोध घेत त्यांची माहिती काढली पोलीस अधीक्षक पंकज कुमावत अप्पर पोलीस अधीक्षक तानाजी चिखले यांच्या आदेशाने स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक चंदनसिंग परिहार मधुकर चट्टे साहेब पोलीस उपनिरीक्षक सुग्रीव केंद्रे निलेश भुजबळ पोलीस अंमलदार महेश कोठाळे राहुल परसोडे माणिक वाघ नेताजी गीते अनिता राठोड उत्तम हनवते दिलीप नीलपत्रेवार शरद सावंत यांच्या पथकाने शोध घेतला फरार आरोपी दिलीप ब्रम्हनाथकर याला परभणी येथून तर मीरा रमेश कुलकर्णी गणेश रमेश कुलकर्णी नागेशनेताजी ब्रम्हनाथकर सहभागी असले चारी आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने परभणी छत्रपती संभाजी नगरीतून ताब्यात घेतले पुढील कारवाईसाठी सदर या प्रकरणात मयताचा मुलगा व्यंकटेश जाधव यांच्या तक्रारीवरून सोनपेठ पोलिसात गुन्हा दाखल पुढील तपास सोनपेठ पोलीस करत आहेत.

## एमजीएम मध्ये लोकरंगात रंगले विदेशी अभ्यासक; लोककला सादरीकरणाला दाद

### लावणी, भारुड, गोंधळाने जिंकली विदेशी पाहुण्यांची मने

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी मिशन (एमजीएम) विद्यापीठात आयोजित १७ व्या आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय शैक्षणिक परिषदेनिमित्त सादर करण्यात आलेल्या 'लोकरंग मराठी मातीचा...' या बहारदार लोककला कार्यक्रमाने विदेशी अभ्यासकांना मराठी संस्कृतीची समृद्ध परंपरा अनुभवण्याची संधी मिळाली. संगीत व नाट्य विभागाच्या कलाकारांनी सादर केलेल्या या कार्यक्रमाला अमेरिका, जॉर्डन, मोरोक्कोसह विविध देशांतील पाहुण्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृहात आयोजित या कार्यक्रमात महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचे विविध रंग खुलविण्यात आले. डॉ. राजू सोनवणे यांच्या दिग्दर्शनाखाली सादर झालेल्या कार्यक्रमात नमन नृत्य, गोंधळ, कोळी नृत्य, भारुड, लावणी, अभंग आदी पारंपरिक कलाप्रकारांचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले. सादरीकरणातील उत्स्फूर्तता, पारंपरिक वेशभूषा आणि लोकसंगीताच्या सुरांनी विदेशी पाहुण्यांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले.

## वडाळी, टाका वस्तीचा पाणीप्रश्न सुटला; राजूबाबा काळे अन् दादाराव आपार यांच्या प्रयत्नांना यश

### विहीर मोलक व टँकर चालकाचा ग्रामस्थांकडून कृतज्ञता सत्कार शिवना



**अजिंठा :** मादनी-वडाळी ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या वडाळी आणि टाका वस्ती येथे गेल्या काही दिवसांपासून निर्माण झालेली गंभीर पाणीटंचाई अखेर दूर झाली आहे. लोकप्रतिनिधींच्या तात्काळ पाठपुराव्यामुळे गेल्या चार दिवसांपासून या भागात टँकरद्वारे नियमित पाणीपुरवठा सुरू करण्यात आला असून, ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे.

उन्हाची तीव्रता वाढल्याने परिसरातील पाण्याचे स्रोत पूर्णपणे आटले होते. त्यामुळे वडाळी आणि टाका वस्तीवरील नागरिकांना पाण्यासाठी मैलोन्मैल भटकंती करावी लागत होती. नागरिकांची ही बिकट परिस्थिती लक्षात घेता, जिल्हा परिषद सदस्य निकिता राजेंद्र काळे यांनी तातडीने दखल घेत टँकर मंजूर करून घेतले. यासाठी ग्रामपंचायत सदस्य दादाराव पाटील आपार यांनी प्रशासनाकडे विशेष प्रयत्न आणि सातत्याने पाठपुरावा केला होता. लोकप्रतिनिधींच्या या प्रामाणिक प्रयत्नांमुळे गावात वेळेत पाणी पोहोचू शकले.

**विहीर मालक अन् टँकर चालकाचा सत्कार**

टँकरच्या माध्यमातून गावातील विहिरीत पाणी सोडत असताना वडाळी ग्रामस्थांच्या वतीने एक आगळावेगळा कृतज्ञता सोहळा पार पडला. या संकट काळात गावाला पाणी उपलब्ध करून देणारे मादनी येथील विहीर मालक रतन पाटील कालविले व संजू पाटील कालविले, तसेच भरउन्हात सेवा देणारे टँकर चालक दिलीप सिंग राजपूत यांचा ग्रामस्थांच्या वतीने शाल आणि पुष्पहार देऊन जाहीर सत्कार करण्यात आला.

**ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण**

गावात टँकर सुरू झाल्याने दोन्ही वस्त्यांवरील पाण्याचा प्रश्न मिटला आहे. पाणी आल्याच्या आनंदात आयोजित या प्रसंगी विष्णू पाटील अपार, दादाराव पाटील काळे यांच्यासह वडाळी गावातील सर्व प्रतिष्ठित नागरिक, तरुण आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. समस्त ग्रामस्थांनी जिल्हा परिषद सदस्य निकिता राजेंद्र काळे व ग्रामपंचायत सदस्य दादाराव पाटील आपार यांचे मनापासून आभार मानले आहेत.

## इन्फोसिस एम्प्लॉयबिलिटी ट्रेनिंग प्रोग्राम 2026 ला विद्यापीठात प्रारंभ




**छत्रपती संभाजीनगर, दि.१५ :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रारंभदिनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व्यवस्थापनशास्त्र विभागाने पुढाकार घेत 'इन्फोसिस एम्प्लॉयबिलिटी ट्रेनिंग प्रोग्राम २०२६' या विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

इन्फोसिसच्या सीएसआर विभागामार्फत प्रोजेक्ट जेनेसिस अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या या प्रशिक्षण कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये रोजगारक्षम कौशल्ये, संवाद कौशल्ये, तार्किक क्षमता, व्यावसायिक शिष्टाचार आणि कॉर्पोरेट क्षेत्रासाठी आवश्यक असलेली तयारी विकसित करणे हा आहे. हा प्रशिक्षण कार्यक्रम १५ जून ते ३० जून २०२६ या कालावधीत व्यवस्थापनशास्त्र विभागात आयोजित करण्यात आला.

नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी विभागातील एम.बी.ए., एम.सी.ए. तसेच बी.सी.ए. विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्राच्या अपेक्षांशी सुसंगत बनविण्यासाठी अशा प्रकारच्या कौशल्यवर्धन कार्यक्रमाचे आयोजन करून विभागाने विद्यार्थी-केंद्रित दृष्टिकोन अधोरेखित केला आहे. विद्यापीठाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच रोजगार क्षमतेला प्राधान्य देण्याच्या ध्येयाशी ही संकल्पना सुसंगत आहे. हा कार्यक्रम वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. वीणा हुंबे तसेच व्यवस्थापनशास्त्र विभागाचे संचालक डॉ. अभिजीत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. यावेळी डॉ. अभिजीत शेळके यांनी आजच्या स्पर्धात्मक युगात रोजगारक्षम कौशल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी या प्रशिक्षणाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. तसेच विद्यार्थ्यांच्या करिअर विकासासाठी विभाग सातत्याने प्रयत्नशील असून इन्फोसिसच्या या उपक्रमाबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. विश्वनाथन कल्याण हे इन्फोसिस चे अनुभवी प्रशिक्षक असून ते मुंबईहून या प्रशिक्षणासाठी विद्यापीठात आले आहेत. त्यांना व्यक्तिमत्त्व विकास व रोजगारक्षमता वृद्धी क्षेत्रातील २० वर्षांहून अधिक अनुभव आहे. कार्यक्रमास डॉ.यशवंत वायकर, डॉ.सुचेता यंबल, डॉ.श्वेता पाटील, प्रा.राम कलानी यांच्यासह विभागातील प्राध्यापक उपस्थित होते. आना खान यांनी सूत्रसंचालन केले. विभागीय प्लेसमेंट समन्वयक डॉ. फारूक खान आणि केंद्रीय प्रशिक्षण व प्लेसमेंट कक्षाचे प्लेसमेंट अधिकारी डॉ. गिरीश काळे हे कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून कार्यरत आहेत.

## समाजसेवक मिर्झा अनिस बेग व तौफिक शहा यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) मध्ये जाहीर प्रवेश




**छत्रपती संभाजीनगर :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) अल्पसंख्याक विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य कार्यक्रमात प्रसिद्ध समाजसेवक मिर्झा अनिस बेग व तौफिक यांनी पक्षात जाहीर प्रवेश केला. हा प्रवेश सोहळा सोमवार, दि. १५ जून २०२६ रोजी राष्ट्रवादी भवन, हडको कॉर्नर येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

पक्षाचे वरिष्ठ नेते अफजल फारुख, डॉ. मुजाहिद खान आणि वारिस खान यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग तांगडे पाटील हे होते. तसेच अल्पसंख्याक विभागाचे जिल्हाध्यक्ष रज्जाक पठाण, जिल्हा कार्याध्यक्ष सैय्यद लायकोद्दीन,जिल्हा प्रभारी अब्दुल समद बागवान आणि निरिक्षक हाजी डॉ. रिझवान खान यांची विशेष उपस्थिती व मार्गदर्शन लाभले.मान्यवरांच्या उपस्थितीत मिर्झा अनिस बेग व तौफीक शहा यांचे पक्षात स्वागत करण्यात आले. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमात शेख शफीक,वाजेद अस्लम,ऊबेद देशमुख,जिल्हा कार्याध्यक्ष विश्वजीत चव्हाण,गंगापुर तालुका अध्यक्ष सुर्यकांत थोरात,कार्याध्यक्ष शेख नईम,शेख मुबारक,शेख सलीम, शेख शकील,अशफाक जमील खान,जावेद मदार,नईम शहा,जहीर शेख,मोमीन शहा,शेख मुश्ताक,लड्डु शेख,शेख उमेर,सोहेल कादरी,अनुराधाताई सोनपारे,यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची विचारधारा, सामाजिक बांधिलकी आणि सर्वसमावेशक विकास यावर भाष्य केले. तसेच मिर्झा अनिस बेग व तौफिक शहा यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक करत त्यांच्या पक्षप्रवेशामुळे संघटनेची ताकद अधिक वाढेल, असा विश्वास व्यक्त केला.

राष्ट्रवादी भवन येथे पार पडलेल्या या प्रवेश सोहळ्याला कार्यकर्ते, पदाधिकारी व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा कार्याध्यक्ष सैय्यद लायकोद्दीन यांनी केले, तर उपस्थित मान्यवरांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## खिर्डी जि.प.शाळेत प्रवेशोत्सव व विद्यार्थ्यांना गणवेश व पुस्तकाचे मंदा वाकळे यांच्या हस्ते वाटप



हिंदू प्रकाश वार्ता

खुलताबाद प्रतिनिधी १५ जून सोमवार रोजी शैक्षणिक सत्र २०२६ .२७ अंतर्गत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा खिर्डी येथे प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून खुलताबाद पंचायत समिती उपसभापती मंदाताई बद्रीनारायण वाकळे उपस्थित होत्या. तसेच ए पी आय बोडखे तसेच कॉन्स्टेबल वारे यांची उपस्थिती होती . सरपंच उपसरपंच शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष उपाध्यक्ष सर्व सदस्य शिक्षण प्रेमी नागरिक उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले मान्यवरांचा सत्कार करण्यात आला प्रमुख अतिथींच्या हस्ते विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले.

## शिक्षणाची नवी पाऊले... नवागत चिमुकल्यांचे उत्साहात स्वागत!



**अजिंठा :** आज शिवना येथील जिल्हा परिषद शाळा, शिवना आणि तडवी भील आदिवासी शाळा, शिवना येथे नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी नवागत विद्यार्थ्यांचे अत्यंत आनंदी वातावरणात स्वागत करण्यात आले! याप्रसंगी विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित करण्यासाठी आणि त्यांना पुढील वाटचालीस प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हा परिषद सदस्य कु. निकिता राजुबाबा काळे यांनी दोन्ही शाळांना सदिच्छा भेट दिली व उपस्थित विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांना वही-पुस्तकांचे वाटप केले. या सुंदर उपक्रमावेळी उपस्थित मान्यवर व शिक्षक वृंद, कु. निकिता राजुबाबा काळे (जिल्हा परिषद सदस्य), कोमल राऊत, जिल्हा परिषद शाळा (शिवना), राणे मॅडम, बाविस्कर सर, काळे सर, जहांगीर सर, तडवी भील आदिवासी शाळा (शिवना), वायाळ मॅडम, काटकर मॅडम, लोखंडे मॅडम.

यावेळी दोन्ही शाळांमधील सर्व शिक्षक आणि लाडके विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

## लिहाखेडीत घरावर छापा; बेकायदेशीर तलवार जप्त, एकावर गुन्हा



**अजिंठा:** सिल्लोड तालुक्यातील लिहाखेडी येथे घरात विनापरवाना लोखंडी तलवार बाळगणाऱ्या एका विरुध्द अजिंठा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रविवारी (दि १४) रात्री करण्यात आलेल्या कारवाईत पोलिसांनी आरोपीच्या घरातून सुमारे दोन फूट नऊ इंच लांबीची तलवार जप्त केली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अवैध धंद्यांच्या तपासासाठी अजिंठा पोलिस पथक छत्रपती संभाजीनगर-जळगाव राष्ट्रीय महामार्गावरील लिहाखेडी चौफुली परिसरात गस्त घालत होते.या दरम्यान लिहाखेडी येथील राजू शेषराव सपकाळ याच्या घरात बेकायदेशीररीत्या लोखंडी तलवार ठेवण्यात आल्याची माहिती पोलिसांना मिळाली.अजिंठा पोलिस ठाण्याचे सपोनि पवन इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक रामेश्वर इंगळे,पोहेकॉ कॉन्स्टेबल निलेश सिरस्कर,जफर पठाण आदी पोलिसांनी पंचासह आरोपीच्या घरावर छापा टाकला असता एका खोलीत पिवळ्या रंगाच्या गोणीजवळ काळसर रंगाची लोखंडी तलवार आढळून आल्याने पोलिसांनी ती जप्त केली.

## जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा,सोयगाव येथे भव्य शाळा प्रवेशोत्सव उत्साहात संपन्न

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव,दि.१५ जून :** सोयगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी आयोजित करण्यात आलेला भव्य शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात,आनंदात आणि मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

विद्यार्थ्यांचे स्वागत,प्रवेशोत्सव रॅली,शैक्षणिक साहित्य वितरण,पालक मार्गदर्शन तसेच वृक्षारोपण अशा विविध उपक्रमांनी कार्यक्रमाला विशेष रंगत प्राप्त झाली.

या कार्यक्रमास जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले.त्यांच्यासह जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सारिका लाडगे,पंचायत समिती सभापती उत्तम राठोड,पंचायत समिती सदस्य राहुल राठोड, गटविकास अधिकारी अमोल जगताप,गटशिक्षणाधिकारी सचिन शिंदे,सोयगाव केंद्रप्रमुख फिरोज तडवी,माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष रविंद्र काळे,शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष भागवत गायकवाड तसेच सदस्य राजेंद्र दुतोंडे,रविंद्र साखळे,अण्णा वाघ उपस्थित होते.

तसेच सोयगाव पोलीस स्टेशनचे नारायण जिरी,राजू सोनवणे,आगार प्रमुख मनीष जवळेकर,अण्णासाहेब ढेपले, संतोष पाखरे आणि मधुकर आमटे यांनीही कार्यक्रमास उपस्थित राहून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.



कार्यक्रमात नवागत विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले. शाळा प्रवेशोत्सव रॅलीद्वारे शिक्षणाचे महत्त्व समाजापर्यंत पोहोचविण्यात आले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले तसेच पालक मार्गदर्शन व संवाद सत्राचे आयोजन करण्यात आले.विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहितीही यावेळी देण्यात आली.

यावेळी पुष्पाताई काळे यांच्या हस्ते दोन वृक्षांची लागवड करण्यात आली. त्यांनी शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक ते सहकार्य करण्याची ग्वाही दिली व विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

कार्यक्रमादरम्यान सर्व मान्यवरांनी शाळा परिसर, वर्गखोल्या,शैक्षणिक सुविधा तसेच विद्यार्थ्यांच्या विविध उपक्रमांची पाहणी केली. विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या गुणवत्तेचे,कलागुणांचे व आत्मविश्वासाचे मनापासून कौतुक केले. शाळेतील स्वच्छता,शिस्त आणि सकारात्मक शैक्षणिक वातावरण पाहून सर्व मान्यवरांनी समाधान व्यक्त केले. तसेच शाळेच्या प्रगतीसाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचेही कौतुक करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक किरणकुमार पाटील,सुरेखा चौधरी,महाकाळ मॅडम,प्रतिभा कोळी,सविता पाटील,गणेश बाविस्कर,अकुश काळे,मंगला बोरसे,मंदा म्हस्के,पांडुरंग बारगजे,पूनम कल्याणकर,शुभम देसले,शेख विकार आणि बागवान सर यांनी विशेष परिश्रम घेतले. मुख्याध्यापक किरणकुमार पाटील यांच्या नेतृत्वाखाली शाळेने शैक्षणिक,सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती साधली आहे.विद्यार्थीकेंद्रित उपक्रम,गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांचे सातत्यपूर्ण प्रयत्न प्रेरणादायी आहेत. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नियोजनामुळे शाळेची ओळख तालुक्यात एक आदर्श शाळा म्हणून निर्माण होत असून उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याचे विशेष कौतुक केले.

मुख्याध्यापक, शिक्षक वृंद,शालेय व्यवस्थापन समिती, माजी विद्यार्थी संघ,पालक आणि ग्रामस्थ यांच्या सहकार्यामुळे हा शाळा प्रवेशोत्सव अत्यंत यशस्वी ठरला. विद्यार्थ्यांचा उत्साह,पालकांचा सहभाग आणि मान्यवरांचे मार्गदर्शन यामुळे नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात प्रेरणादायी वातावरणात झाली.


# सूचना, समज... तरीही प्रसूती कक्षात वाद; लाडसावंगी प्रकरणात आता कारवाई अटळ?

## वारंवार तक्रारींकडे दुर्लक्ष की प्रशासनाची मूकसंमती? डीएचओंकडे अहवाल, सीईओंकडून कठोर निर्णयाची अपेक्षा

**हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी सिद्धेश्वर थोर**

**छत्रपती संभाजीनगर :** लाडसावंगी प्राथमिक आरोग्य केंद्रातील प्रसूती कक्षात डॉक्टर आणि परिचारिकेमधील वादाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर आरोग्य प्रशासनाची झोप उडाली आहे. रुग्णसेवेसारख्या अत्यंत संवेदनशील विभागात घडलेल्या या प्रकाराची गंभीर दखल घेत तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. नागेश सावरगावे यांनी प्राथमिक चौकशी अहवाल जिल्हा आरोग्य अधिकारी (डीएचओ) यांच्याकडे सादर केला आहे. अंतिम अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) यांच्याकडे पाठविण्यात येणार असून संबंधितांवर कठोर कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जा[...] आहे.

विशेष म्हणजे, या घटनेतील वैद्यकीय अधिका[...] डॉ. पुनम मुंडे आणि परिचारिका सुकेशनी साळ[...] यांच्यातील वाद हा पहिलाच नसल्याचे चौकशी[...] समोर आले आहे. यापूर्वीही दोघांविरोधात तक्रारी प्रा[...] झाल्यानंतर आरोग्य विभागाने समुपदेशन व बैठ[...] घेऊन रुग्णसेवेला प्राधान्य देण्याच्या सूचना दिल[...] होत्या. मात्र त्या सूचनांचा कोणताही परिणाम दिसून आल्याने अखेर प्रसूती कक्षातील वाद रस्त्यावर आला आणि त्याचा फटका थेट रुग्णसेवेला बसल्याचे चित्र निर्माण झाले.



[...]ल असलेल्या [...]हा रुग्णालय [...]वे लागल्याने [...]कारी आरोग्य [...] सुरू असताना [...] केला जाऊ [...] करत आहेत. [...]ऱ्यांची स्वतंत्र [...]रल व्हिडिओ, प्रसूतीदरम्यानची परिस्थिती, रुग्णसेवेवर झालेला परिणाम तसेच यापूर्वीच्या तक्रारींचा तपशील चौकशी अहवालात समाविष्ट करण्यात आला आहे. त्यामुळे केवळ या एका घटनेपुरती नव्हे, तर संपूर्ण सेवाविषयक वर्तनाची पडताळणी प्रशासनाकडून केली जात आहे.

आरोग्य विभाग आणि राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) च्या सेवा नियमांनुसार संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई, कारणे दाखवा नोटीस, बदली किंवा अन्य प्रशासकीय निर्णय घेतले जाऊ शकतात. मात्र या वेळी केवळ कागदी कारवाई नको, तर भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ठोस संदेश देणारा निर्णय व्हावा, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

### प्रश्न एका व्हिडिओचा नाही, रुग्णांच्या विश्वासाचा आहे!

सरकारी आरोग्य व्यवस्थेवर सर्वसामान्य नागरिकांचा विश्वास टिकविण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. वारंवार तक्रारी, समुपदेशनानंतरही न सुधारणारे वर्तन आणि अखेर प्रसूती कक्षातील वादाचा व्हायरल व्हिडिओ हे केवळ शिस्तभंगाचे प्रकरण नसून रुग्णांच्या सुरक्षिततेशी संबंधित बाब मानली जात आहे. त्यामुळे या प्रकरणात केवळ चौकशी न करता जबाबदारी निश्चित करून कठोर कारवाई झाली, तरच आरोग्य यंत्रणेत शिस्त आणि नागरिकांचा विश्वास कायम राहील, अशी भावना परिसरातून व्यक्त होत आहे.

# मुंबईवर मात करत कोल्हापूरचा राज्य अजिंक्यपदावर कब्जा

## 15 वर्षांखालील राज्यस्तरीय हँडबॉल स्पर्धेचा समारोप



**हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** राज्य हँडबॉल संघटनेचे अध्यक्ष तथा राज्याचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या १५ वर्षांखालील मुलांच्या राज्यस्तरीय हँडबॉल स्पर्धेत कोल्हापूर संघाने दमदार कामगिरी करत राज्य अजिंक्यपद पटकावले. अंतिम सामन्यात कोल्हापूरने मुंबई संघाचा २९-२४ असा पराभव करून विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. मुंबईला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले, तर धुळे संघाने तृतीय क्रमांक मिळविला.

स्पर्धेतील उपांत्य फेरीत मुंबई संघाने धुळेवर १३ गोलांच्या फरकाने विजय मिळवत अंतिम फेरीत धडक मारली. दुसऱ्या उपांत्य सामन्यात कोल्हापूरने नागपूर संघावर ५ गोलांनी मात करत अंतिम फेरी गाठली.

अंतिम सामना अत्यंत रंगतदार आणि चुरशीचा झाला. दोन्ही संघांनी वेगवान व आक्रमक खेळाचे दर्शन घडविले. पहिल्या सत्रापासूनच सामना बरोबरीत सुरू असताना उत्तरार्धात कोल्हापूरच्या खेळाडूंनी प्रभावी बचावासह अचूक आक्रमणाची जोड देत आघाडी घेतली. अखेरीस २९-२४ अशा फरकाने विजय मिळवत कोल्हापूरने राज्य अजिंक्यपदावर नाव कोरले.

मुंबई संघाकडून वेद याने ८ तर प्रथम याने ६ गोलांची नोंद केली. मात्र कोल्हापूरकडून शिवराज पाटील व करण कोरगडे यांनी प्रत्येकी ८ गोल झळकावले. पृथ्वीराज पाटील याने ५ गोल करत संघाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली.

तृतीय क्रमांकाच्या सामन्यात धुळे संघाने नागपूरचा पराभव केला. धुळेच्या हिमांशूने १६ तर अथर्वने ९ गोल करत संघाच्या विजयात सिंहाचा वाटा उचलला. नागपूरकडून शक्यने १० आणि अथर्वने ५ गोल केले.

स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात मुख्य आयोजक उद्योजक अजिंक्य सावे यांच्या हस्ते विजेत्या व उपविजेत्या संघांना चषक आणि पारितोषिके प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्य हँडबॉल संघटनेचे सहसचिव पंकज भारसाखळे होते. यावेळी पंच समितीचे प्रमुख मिलिंद शिंदे, जिल्हा सचिव डॉ. सत्यजीत पगारे, मनीष पाटील, डॉ. रंजन बडवने यांची प्रमुख उपस्थिती होती.

# इनोव्हा कारमधून गांजा तस्करी; 10.53 लाखांचा मुद्देमाल जप्त

**हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी**



**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यातील अमली पदार्थांच्या अवैध व्यापारावर आळा घालण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने राबविलेल्या विशेष मोहिमेत मोठी कारवाई करत गांजा तस्करीचा प्रयत्न उधळून लावला आहे. जालना रोडवरील गाडे जळगाव शिवारात सापळा रचून करण्यात आलेल्या या कारवाईत १० लाख ५३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून मुख्य संशयित तस्कराला अटक करण्यात आली आहे.

राज्यातील तरुण पिढीला अमली पदार्थांच्या विळख्यातून वाचविणे आणि सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण करणे या उद्देशाने राज्य उत्पादन शुल्क विभागाने जिल्ह्यात 'झिरो टॉलरन्स' धोरण स्वीकारले आहे. राज्य उत्पादन शुल्क आयुक्त, अपर आयुक्त, सहआयुक्त (अमलबजावणी व दक्षता), विभागीय उपायुक्त तसेच जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

विभागाला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, जालन्याकडून छत्रपती संभाजीनगरकडे अवैधरित्या गांजाची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार गाडे जळगाव शिवार (करमाड, ता. व जि. छत्रपती संभाजीनगर) येथे नाकाबंदी करण्यात आली. या वेळी संशयित पांढऱ्या रंगाची इनोव्हा कार (एमएच-०४ डीई-३३४६) अडवून तपासणी करण्यात आली.

तपासणीदरम्यान वाहनात ४.५० किलो गांजा आढळून आला. जप्त करण्यात आलेल्या गांजाची किंमत सुमारे ४ लाख ५३ हजार रुपये असून वाहनासह एकूण १० लाख ५३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी बद्रीनाथ भुमटे (वय ४२) या मुख्य संशयित आरोपीला अटक

# पहाटेच्या धाडीत नशेच्या गोळ्यांचा पर्दाफाश; हनुमान नगरातील तिघांवर गुन्हा

**छत्रपती संभाजीनगर :** हनुमान नगरातील एका घरातून सुरू असलेल्या कथित नशेच्या गोळ्यांच्या अवैध व्यवहारावर पुंडलिकनगर पोलिसांनी पहाटेच्या धाडीत मोठा घाव घातला. या कारवाईत 141 नशेच्या गोळ्या आणि एक मोबाईल जप्त करण्यात आला असून तिघांविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पहाटे सुमारे अडीच वाजता हनुमान नगर, गल्ली क्रमांक 2 येथे छापा टाकण्यात आला. या वेळी जयेश संजय पवार याच्या ताब्यात विनापरवाना नशेच्या गोळ्यांचा साठा आढळून आला. या प्रकरणात मंगल तनपुरे आणि सोनल तनपुरे यांनी गोळ्यांच्या विक्रीसाठी जागा उपलब्ध करून दिल्याचा आरोप पोलिसांनी केला आहे. कारवाईदरम्यान पोलिसांनी 141 नशेच्या गोळ्या आणि एक मोबाईल जप्त केला. आरोपींविरोधात एनडीपीएस कायद्याअंतर्गत गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू करण्यात आला आहे. दरम्यान, आरोपी मंगल तनपुरे हिचे नाव यापूर्वीही गंभीर गुन्ह्यांमध्ये समोर आले असल्याची चर्चा परिसरात आहे. काही महिन्यांपूर्वीच ती कारागृहातून बाहेर आल्यानंतर पुन्हा संशयास्पद हालचाली सुरू झाल्याची माहिती स्थानिकांकडून दिली जात आहे.

# एमजीएम परिवारात वर्षमंगलाचा जल्लोष; कुलपती अंकुशराव कदम यांच्या 82 व्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रम

**दैनिक हिंदूआकाशवार्ता**

**छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी दि.१५ :** महात्मा गांधी मिशनचे सचिव तथा एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम यांचा ८२ वा वाढदिवस आज 'वर्षमंगल' दिनाच्या निमिताने एमजीएममध्ये उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या औचित्याने वृक्षारोपण, सांस्कृतिक कार्यक्रम, उद्घाटन आणि समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात एमजीएम गांधेली परिसरात आज ८३ वृक्षांची लागवड करून करण्यात आली. त्यानंतर सकाळी एमजीएम विद्यापीठ परिसरात नव्याने उभारलेल्या इलेक्ट्रिकल सब स्टेशन'चे उद्घाटन करण्यात आले. या ठिकाणी प्रातिनिधिक स्वरूपात वृक्षारोपण करण्यात आले. तसेच रुक्मिणी सभागृह येथे आयोजित कार्यक्रमात सर्वांना



वृक्ष वाटप करण्यात आली. त्याचप्रमाणे एमजीएम युनिव्हर्सिटी डिपार्टमेंट ऑफ इन्स्ट्रुमेंटेशन अँड कंट्रोल इंजिनिअरिंगच्या शैक्षणिक सुविधांच्या नामफलकांचे अनावरण यावेळी करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ.पी.एम.जाधव, शिक्षणतज्ञ श्री. भाऊसाहेब राजळे, डॉ.पी.वाय.कुलकर्णी, कुलगुरू प्रा. डॉ.विलास सपकाळ, श्रीमती अनुराधाताई कदम तसेच एमजीएम परिवारातील सर्व सदस्य, सर्व अधिष्ठाता, संचालक, प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कुलपती अंकुशराव कदम यांना शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आज प्रत्यक्षपणे भेट घेऊन वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.

# वीज चोरी करणाऱ्या सात जणांविरुद्ध गुन्हे; महावितरणची नगर तालुक्यात कारवाई

**अहिल्यानगर:** नगर तालुक्यातील शेंडी गावच्या शिवारात महावितरण कंपनीकडून वीज चोरीविरुद्ध मोठी कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईत सात वेगवेगळ्या ठिकाणी सुरू असलेली वीज चोरी उघडकीस आणली असून, या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात सात जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.






# उपवर्गीय आरक्षण मागणीसाठी कार्यालयावर धडकला आसूड मोर्चा

**हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी**



**परभणी :** हजारो मातंग समाज बांधव मोर्चा सहभागी.

अनु जाती उपर्गीकरण निर्णयाच्या अंमलबजावणी करा मागणीसाठी. गेल्या अनेक वर्षापासून आरक्षणाची मागणी मागणी जोर धरू लागलेली आहे शहरापासून ग्रामीण भागापर्यंत पोहोचले असताना आरक्षण उपयोगी करण्याचा निर्णय तात्काळ घेण्यात यावा या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर आरक्षण आसूड मोर्चा काढण्यात आला शहरातील साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला अभिवादन करून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून. मातंग समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाला होता. अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण प्रारूप आराखडा ठरवण्यासाठी नेमलेल्या न्यायमूर्ती बद्दल समितीने मात्र त्याची अंमलबजावणी करण्यास काही ठराविक जातींनाच आरक्षणाचा लाभ मिळत होता मात्र काही जाती या सर्व प्रक्रियेतून बाहेर फेकल्या जात होत्या त्यांना संधी निर्माण करून देण्यासाठी सरकारने विशेष तरतूद केली अशी शिफारस 1965 सालीच बी एन लोकूर समितीने केली होती मूर्ती बद्दल समितीने अहवाल सादर करून उप वरीकरणाची शिफारस केली त्यामुळे शासनाने न्यायमूर्ती मतदार समितीचा अहवालाची अंमलबजावणी करून उपवर्गीकरणाचा निर्णय घेऊन राज्यात अंमलबजावणी करावी या मागणीसाठी आरक्षण आसूड मोर्चा सोमवारी विविध मातंग समाजाच्या संघटनाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात आला या मोर्चात काँग्रेस गणपत विषयी तेथे भारताकडे रोहिदास नेटके कुणाल गायकवाड पप्पूराज शेळके अरुण सोनवणे दादाराव काळे कोंडीबा जाधव एल डी कदम रेखा कांबळे आदीसह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता.

# पोलीस काका-दिदी' बनले विद्यार्थ्यांचे संरक्षण कवच; जिल्ह्यातील 508 शाळांमध्ये स्वागत

**हिंदू प्रकाशवार्ता :** प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** शाळेच्या नव्या शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस दलाने 'पोलीस काका व पोलीस दिदी' उपक्रम राबवत विद्यार्थ्यांशी आपुलकीचा संवाद साधला. पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील ५०८ शाळांना ६० पोलीस अधिकारी आणि ४०४ पोलीस अंमलदारांनी भेटी दिल्या.

उपविभागीय पोलीस अधिकारी, ठाणे प्रभारी अधिकारी तसेच दामिनी पथकातील कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांनी जिल्हा परिषद माध्यमिक विद्यालय, लाडगाव येथे भेट देऊन विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देत स्वागत केले. विद्यार्थ्यांच्या विविध कलाकृतींची पाहणी करून त्यांच्या गुणवत्तेचे कौतुकही केले.

या उपक्रमात विद्यार्थ्यांना पोलीसांविषयी असलेली भीती दूर करण्यावर भर देण्यात आला. अडचणीच्या प्रसंगी पोलिसांची मदत घ्यावी, हरवल्यास किंवा कोणी त्रास दिल्यास तातडीने पोलीस काका-दिदींशी संपर्क साधावा, असा विश्वास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्यात आला. तसेच डायल ११२ आणि चाइल्ड हेल्पलाइन १०९८ या क्रमांकांची माहिती खेळाच्या माध्यमातून देण्यात आली.

सायबर सुरक्षेबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. मोबाईलचा अतिवापर, गेमिंगचे व्यसन, सोशल मीडियाचा अतिरेक तसेच अनोळखी व्यक्तींशी वैयक्तिक माहिती शेअर करण्याचे धोके याबाबत जनजागृती करण्यात आली. हा उपक्रम केवळ प्रवेशोत्सवापुरता मर्यादित न राहता पुढेही नियमितपणे शाळांमध्ये राबविला जाणार असल्याचे पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांनी सांगितले.


मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911